**नमुना अर्ज - ५**

१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्वसन) अधिनियम, १९७१ मधील कलम वाय ३(१) नुसार झोपडी फोटोपास मिळणे.

२) महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, मंत्रालय मुंबई दिनांक २२ जुलै २०१४ अन्वये दिनांक १/१/२००० अथवा त्या पूर्वी पासुनची झोपडीवासियाचा निवारा निश्चीत करणे.

३) महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, मंत्रालय मुंबई दिनांक १६ मे २०१५ अन्वये दिनांक १/१/२००० अथवा त्या पूर्वी पासुनची संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणा-या झोपडीवासियाचा निवारा निश्चीत करण्याबाबत

४) महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, शुध्दीपत्रक क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जुलै २०१५ अन्वये दिनांक १/१/२००० अथवा त्या पूर्वी पासुनची संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणा-या झोपडीवासियाचा निवारा निश्चीत करण्याबाबत

अर्जदाराचे नाव :- ------------------------------------------
झोपडपट्टीचे नाव :- ----------------------------------------
सर्वेक्षणातील झोपडी क्र. ------------------------------------
दिनांक :- / /२०

प्रति,
मा. सक्षम प्राधिकारी
झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
चिंचवडगाव, पुणे-४११ ०३३

<u>**विषय :- झोपडी हस्तांतर करुन फोटोपास मिळणेबाबत**</u>

महोदय,

कारणे विनंती अर्ज करतो/करते की, माझ्या झोपडीसंबधी पुराव्यार्थी असलेले खालील खरी व बरोबर कागदपत्रे या अर्जासोबत जोडुन सादर करीत आहे.

सदरील झोपडीमध्ये सध्या मी वास्तव्य करीत असून माझे/पत्नीचे/पतीचे नावे अथवा अज्ञान मुलाचे नावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी किंवा घरभाडे अथवा मालकी तत्वावर नसलेचे हमीपत्र मी सोबत जोडले आहे. यापूर्वि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये आम्हास लाभ मिळालेला नाही. अन्य शुल्क (फोटोपास/सेवाकर/हस्तांतरण शुल्क) मी म.न.पा.चे नियमाप्रमाणे भरणेस तयार आहे.

मी दिनांक १ जानेवारी २००० पूर्वि अस्तित्वात असलेल्या झोपडीत आजही रहात आहे तरी सादर केलेले पुरावेनुसार मला पात्र ठरवुन झोपडी फोटोपास मिळावा, ही विनंती.

( सोबत जोडलेल्या कागदपत्रासंबंधी कंसात बरोबर ( ✓ ) अशी खुण करावी.)

१) मूळ झोपडीधारकाचा जुना चा फोटोपास किंवा गणनापत्रकाची पोहोच.................. ( )

२) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर केलेले हस्तांतरण प्रतिज्ञापत्र......................................... ( )

३) विहित नमुन्यातील हमीपत्र............................................................................ (   )

**<u>वि व र ण प त्र</u>**

(शासन निर्णय क्र. झोपुधो-१००१/प्र.क.१२५/१४/झोपसु-१ दि. १३ मे, २०१५)

**दि.१/१/२००० रोजीच्या अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता)**

**उल्लेख असलेले-**

१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन २००० यावर्षी अथवा त्यापूर्वीच्या वर्षाच्या प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतारा ....................................................................(   )

**अथवा**

२) त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/अभिलेख/ देयक .... (   )

**अथवा**

३) राज्य शासनामार्फत संदर्भांकित दि.११ जुलै,२००१ च्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या “पात्र झोपडपट्टीवासियांकरिता ओळखपत्र योजना-२००१ नुसार देण्यात आलेले गणना फॉर्म ............(   )

**अथवा**

४) झोपडीची महानगरपालिका/ नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा. ..........(   )

**अथवा**

५) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी अथवा अकृषिक वापर नियमित करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेल्या अकृषिक कर/अकृषिक दंडाच्या रक्कमेची पावती................(   )

**अथवा**

६) दि.१.१.२००० किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या झोपडपट्टी सह.गृहनिर्माण संस्थेचे सहाय्यक निबंधक, सहकार यांनी प्रमाणित केलेले भाग प्रमाण पत्र. ............................................................(   )

**अथवा**

७) व्यावसायिक अथवा औद्योगिक स्वरुपाच्या वापरात असलेल्या अथवा त्यांसह निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडीच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शविणारा महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदेचा दि.१/१/२००० अथवा त्यापूर्वी प्राप्त झालेला (अ) गुमास्ता परवाना/ खाणावळ किंवा (ब) उपहारगृह लायसन्स्/त्या अनुषंगाने भरण्यात आलेल्या कराची पावती. ...........................................................................................................(   )

आपला/आपली विश्वासु

( नाव :- ----------------------- )

# प्रपत्र -अ

## स्वयंघोषणापत्र

| अर्जदाराचा फोटो |
| --- |
| |

मी--------------------- श्री. ....................................यांचा मुलगा/मुलगी वय .......... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)...................................व्यवसाय............................राहणार ..........................................याद्वारे घोषित करतो/करते की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विचारार्थ असलेली वाणिज्यिक/निवासी किंवा दोन्ही प्रकारातील झोपडी माझ्या ताब्यात आहे तसेच माझ्या नावे आणि माझ्या पतीच्या/पत्नीच्या नावे अथवा अठरा वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नावे या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात अन्य झोपडी/घर /सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नाही आणि ही सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-.................................                    अर्जदाराची सही :-......................

दिनांक :-..................................                    अर्जदाराचे नाव :-......................

## प्रपत्र -ब

## स्वयं-साक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी--------------------- श्री. ....................................यांचा मुलगा/मुलगी वय .......... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)...................................व्यवसाय............................राहणार ..........................................याद्वारे घोषित करतो/करते की, मी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पात्रता तपासण्यासाठी विहित पुराव्याच्या स्वयं साक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-................................ अर्जदाराची सही :-......................

दिनांक :-................................. अर्जदाराचे नाव :-......................